# University of Mumbai

परीक्षा विभाग/विज्ञान निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.

क्र.परीक्षा/विज्ञान/९०९८/२०१८

## परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान व व्यवस्थापन, महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्रांचे समन्वय व विद्यापीठाच्या ठाणे उपकेंद्राचे मानद सल्लागार यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, प्रथम सत्र २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या B.Sc.(IT)(Sem.VI)(75:25) व B.Sc.(Sem.VI)(75:25) चे निकाल अनुक्रमे दि. २५ जून, २०१८ व दि. ३ जुलै, २०१८ रोजी जाहिर करण्यात आले. निकाल जाहिर करेपर्यंत काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची पात्रता निश्चित (Eligibility Confirmation) करून Final Eligibility चा तपशील (Status) व विद्यार्थ्यांचे प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षांचे (सत्र परीक्षा १ ते ४) चे उत्तीर्ण व अनुत्तीर्ण बाबत निकालाचा तपशील (Lower Examination Report Status with Grade & Grade Point) परीक्षांचे निकाल परीक्षा विभागाने दिलेल्या Online link वरून भरून न कळविल्यामुळे काही विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवावे लागले आहेत. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांची अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त कारणांबाबतची माहिती दि. १४ जुलै, २०१८ पर्यंत ५००/– रुपये प्रती विद्यार्थी प्रमाणे दंड/विलंब शुल्क भरून सादर करावी ज्यामुळे सदर सर्व राखीव निकाल एकाच दिवशी जाहिर करता येतील. तसेच नमुद बाबींचा तपशील दि. १४ जुलै, २०१८ नंतर प्राप्त झाल्यास सदर विद्यार्थ्यांचे निकाल विलंबाने प्रसिध्द झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची असेल यांची नोंद घ्यावी.

6/7/18

मुंबई – ४०००९८
दि.०६ जुलै, २०१८.

(प्रा.(डॉ) अर्जुन पी. घाटुळे)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

D:\Chaudhri sirs\ All Circular